Vol 6 Issue 1 July 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 1 | July - 2016

Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal
RNI : MAHMUL/2011/38887
ISSN No: 2231-5063
Impact Factor 2.2052 (UIF) [Yr. 2014]
3.4052 (UIF) [Yr. 2015]
4.6052 (UIF) [Yr. 2016]

GRT Golden Research Thoughts

# इतिहासाचार्य कै. वि. का. राजवाडे यांचे मराठ्यांचे इतिहास लेखन आणि कार्य

प्रा. दिलीप आत्माराम शिरसाठ
इतिहास विभाग प्रमुख, ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे
कै. म. दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला, वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

## प्रास्ताविक

देशाच्या इतिहासात ऐतिहासिक साधनांचा शोध घेवून ती संकलित करणे आणि इतिहास संशोधन, लेखन करणे या प्रक्रियेतील एक मोठे नाव म्हणजे विश्वनाथ काशिनाथ राजवाडे हे होय. ऐहिक सांसारिक सुखाचा त्याग करून संन्यास पत्करून राष्ट्रीय कार्याची पूर्ती करण्यास सिद्ध झालेत. हालाखिच्या आर्थिक परिस्थितीवर मात करून आपले जीवनध्येय गाठले. महाराष्ट्रातच नव्हे तर देशभर प्रसंगी देशाबाहेर काबुल,




नेपाळपर्यंत जावून इतिहास साधनांचा शोध घेवून, संकलित करून 22 खंडांमध्ये प्रकाशित करण्याची दुर्दम्य कार्य यशस्वी केले. 23 वर्षांच्या खडतर परिश्रमानंतर मराठ्यांच्या ऐतिहासिक योगदानाला न्याय प्रदान करून दिला. शिवचरित्रातील वास्तवता अभ्यासकांसमोर आणून परकीय इतिहास लेखकांचे आक्षेपार्ह लेखन कसे चुकीचे होते हे साधार पटवून दिले. ‘अमेरिकन हिस्टॉरिकल असोसिएशन’ प्रमाणेच पुण्यात ‘भारत इतिहास संशोधन मंडळा’ची स्थापना केली. ऐतिहासिक संशोधन आणि लेखनाबरोबरच जहाल विचारांच्या प्रभावातून भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाला वैचारिक मार्गदर्शन करून थॉट लिडर म्हणून प्रसिद्धी मिळविली. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळातही राजकीय, धार्मिक, आर्थिक व सामाजिक बाबींवर विचार प्रकट केलेत. शेवटी त्यांच्या कार्याची सांगता धुळे येथे झाली. त्यांच्या स्मरणार्थ धुळ्यात तात्यासाहेब भट यांनी राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना केली. त्यांना इतिहासाचार्य म्हणून गौरविण्यात आले.

## समकालीन विचारवंतांचा प्रभाव

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचा जन्म इ.स.1863 मध्ये झाला. लहानपणापासूनच चंचल व तीक्ष्ण बुद्धीचे असलेले राजवाडे पुढील काळात संतापी व जहाल बनत गेलेत. बालपणापासूनच त्यांच्यावर निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळूणकर, नवनीतकार परशुरामपंत, तात्या गोडबोले आणि काव्येतिहास संग्रह संपादक काशिनाथ नारायण साने या विचारवंताच्या विचारांचा प्रभाव होता. याविषयी वि. का. राजवाडे म्हणतात की, ‘विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या टीकात्मक निबंधांनी इंग्रजीच्या खग्रासापासून माझा बचाव केला, तर का. ना. सानेंच्या काव्येतिहास संग्रहाच्या ऐतिहासिक पत्रांनी स्वदेशी म्हणून काही आहे हे मला कळले व परशुरामपंत गोडबोले यांनी छापलेल्या नवनीत मधील काव्यांनी महाराष्ट्र सारस्वताचा मला अभिमान वाटू लागला.’१ अशा वैचारिक क्षेत्रातील नामवंत दिग्गजांची प्रेरणा राजवाडेंना मिळाली होती.

संस्कारिक संन्यास पत्करला

वि. का. राजवाडे यांचे इ. स. 1888 मध्ये अन्नपूर्णाबाई ह्यांच्याशी विवाह झाला. प्रारंभी ते मराठा वृत्तपत्रामध्ये सहसंपादक म्हणून काम करीत. पुढे सन 1891 मध्ये पुणे येथील न्यू इंग्लिशमध्ये नोकरी पत्करली. मात्र तेथील अधिकाऱ्यांनी दिलेल्या वागणुकीला कंटाळून त्यांनी राजीनामा दिला. कारण त्यांना कोणाच्याही दबावात राहून नोकर म्हणून राहणे पटत नव्हते. सन 1892 मध्ये पत्नीचे निधन झाले.

वैवाहिक जीवनात जन्माप्रसंगीच दोन मुलांचा अंत त्यांना पहावा लागला होता. यापुढे त्यांना वैवाहिक जीवनात रूची राहीली नाही म्हणून दुसरा विवाह न करता धर्मशास्त्राच्या नियमानुसार त्यांनी संन्यास पत्करला.[2]

## लेखनातून राष्ट्रीय जागृती

भारतीय स्वातंत्र्याच्या प्रतीक्षेत खडतर वाटचालीतून जात होते. त्यांना वैचारिक दिशा दाखविण्याची आवश्यकता होती. याकरिता राजवाडे यांनी भाषांतर मासिक आणि वेगवेगळ्या विषयांवरील लेखनाव्दारे जनतेमध्ये राष्ट्रीयत्वाच्या जाणिवा निर्माण केल्यात. जनतेच्या अत्यल्प प्रतिसादामुळे भाषांतर बंद पडले. म्हणून अण्णासाहेब विजापूरकरांच्या ग्रंथमाला मासिकात भाषांतरीत ग्रंथ, लेख आणि ऐतिहासिक साधने प्रसिद्ध केलेत. महाराष्ट्र सरस्वती मंदिर, विश्ववृत्त, राष्ट्रोदय, प्रभात, विद्यासेवक या विषयांवरील लेख अनेक वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेत. सन 1910 पासून भारत इतिहास संशोधक मंडळाच्या इतिवृत्तात आणि सम्मेलन वृत्तांतामधून राजवाडे यांचे लेख प्रसिद्ध होवू लागलेत.[3]

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे मोठे कार्य म्हणजे भारतीय इतिहासाला नवसंजीवनी प्राप्त करून दिली. त्यांनी अपार परिश्रमाने इतिहासाला अत्याधुनिक स्वरूप प्राप्त करून दिले. मोठ्या प्रमाणावर ऐतिहासिक साधनांचा शोध घेवून त्यांचे संकलन आणि संपादनाचे कार्य केले. यामुळेच पुढील काळात भारतीयांना शास्त्रशुद्ध इतिहासाची ओळख होवून इतिहासाचे नवीन स्वरूप उदयास आले. अभ्यासकांना व सामान्य वाचकांना राजवाडेंच्या ऐतिहासिक कामगिरींची ओळख व्हावी म्हणून डॉ. जोशी यांनी ष्राजवाडे विचार दर्शनष नावाचा अभ्यासपूर्ण ग्रंथ सन 1965 मध्ये लिहून काढला. यात डॉ. जोशी यांनी नमूद केले आहे की, ष्इतिहास, इतिहास संशोधन, इतिहास मीमांसा, सामाजिक विचार, वाङ्मय संशोधन, साहित्यचिकित्सा, भाषा, व्याकरण, लिपी व शिलालेख इत्यादी विविध क्षेत्रात राजवाडे यांनी अतिशय प्रगल्भ विचार प्रकट करून ग्रंथ निर्मिती केली आहे.ष यावर स्वतंत्र ग्रंथनिर्मिती होईल, एवढी प्रत्येक विभागाची योग्यता आहे.[4]

## मराठ्यांच्या इतिहासाचे लेखन

मराठ्यांचा इतिहास हा पूर्वग्रहदूषीत असल्याने त्यात सत्य, वास्तवता आणि शास्त्रशुद्धतेकरिता सन 1888 पासून राजवाडेंनी मराठ्यांच्या इतिहासाची अस्सल साधने शोधणे व संकलित करण्याच्या कामाला प्रारंभ केला. पेशावर आणि काबुलपर्यंत व्यापाऱ्यांच्या काफिल्याबरोबर जावून आपले ध्येय सिद्ध करण्याकरिता कार्यरत राहिलेत. यात त्यांना महानुभवी पंथीयांच्या पोथ्यांचा शोध लागला.[5] या कार्याकरिता महाराष्ट्रभर पायी फिरलेत. एवढेच नव्हे तर नेपाळ व कलकत्त्यापासून थेट तंजावरपर्यंत भ्रमंती केली. या काळात त्यांनी ठिकठिकाणच्या देशमुख, वतनदार, इनामदार, राजे सरदार यांच्या भेटी घेवून विनंती करून त्यांच्याकडील धुळखात पडलेल्या दप्तरांचा शेध घेतला. या शोधकार्यात अनेकवेळा कोकणचा प्रदेशही पायी फिरून पालथा घतला.6 राजवाडेंनी इतिहासाचे संशोधन करण्यासाठी केवळ इतिहास लेखन न करता मूळ साधनांच्या शोधनाला प्राधान्य देऊन इतिहास संशोधनात एक क्रांतीच घडवून आणली.

या शोधकार्यातून राजवाडे यांना समर्थ रामदासांच्या दासबोध या प्रसिद्ध ग्रंथाची एक उत्तम प्रतही मिळाली. ही प्रत पाहण्याकरिता सन 1903 मध्ये श्री. नानासाहेब देव व भा. वा. भट हे दोघेही साताऱ्याला वि. का. राजवाडेंकडे गेले होते. राजवाडेंच्या या कार्यामुळेच रामदासी संप्रदायाचा इतिहास पुढील काळात उपलब्ध झाला.[7]

उपलब्ध साधनांच्याव्दारे राजवाडेंनी मराठ्यांच्या गुणदोषांचे बारकाईने अवलोकन केले आणि सदोष लेखनावर भर दिला. सन 1898 ते 1920 पर्यंतच्याकाळात राजवाडेंनी मराठ्यांच्या इतिहास साधनांचे बावीस खंड छापून प्रसिद्ध केलेत. 532 पृष्ठे असलेल्या प्रस्तावनेसह 5544 एकूण पृष्ठसंख्या या खंडाची आहे. त्यात 4417 पत्रे व लेखांचा समावेश आहे. अर्थात या प्रचंड कार्याकरिता राजवाडेंना 23 वर्ष परिश्रम घ्यावे लागलेत. या सर्व खंडाना स्वतः राजवाडेंनी दिलेल्या प्रस्तावना म्हणजे इतिहासशास्त्राच्या दृष्टीने केलेली मराठ्यांच्या इतिहासाची मीमांसाच होय. ह्या लेखनात त्यांनी मराठ्यांच्या पराभवाची कारणमीमांसा करतांना भौतिकशास्त्रीय ज्ञानाचा अभाव असल्याचा सैद्धान्तिक विचारही मांडला आहे. मराठी जनतेला राजवाडेंनी आपल्या लेखनातून महाराष्ट्रधर्माचे प्रभावी सांस्कृतिक हत्यार देऊन मराठी माणसाच्या अस्मितेला पुनःचैतन्य प्राप्त करून दिले.

ग्रॅंड डफसारख्या पाश्चात्य इतिहासकारांनी लिहिलेला पूर्वग्रहदूषित मराठ्यांचा इतिहास खोडून इतिहासशास्त्रीय चिकित्सात्मक नवी दृष्टी इतिहासकारांना आणि वाचकांना दिली हे राजवाडेंचे सर्वात मोठे ऐतिहासिक कार्य होय. जमविलेल्या कागदपत्रांचे लेखन करून ती प्रकाशित करण्याकरिता मोठ्या आर्थिक अडचणीस सामोरे जावे लागले असे असले तरी कर्ज काढून त्यांनी आपली कामगिरी पार पाडली.

मराठ्यांच्या काळातील मोडी लिपीसंबंधी त्यांनी मराठ्यांची इतिहासाची साधने खंड–8 मध्ये महत्त्वपूर्ण टिपणे दिली आहेत. शिवाजी महाराजांच्या 36 पत्रांमधील मोडी अक्षरांच्या संदर्भात ह्या खांडाच्या प्रस्तावनेत राजवाडेंनी एक महत्त्वाचे टिपण दिले आहे. त्यानुसार महाराष्ट्रात सन 1260 ते 1309 या कालावधीत राज्य करणाऱ्या महादेव रामदेव जाधवांच्या दप्तरात काम करणाऱ्या हेमांडपंताने मोडी अक्षर सुरू केल्याचा प्रघात राजवाडेही मान्य करतात. मोडी लिपीचा प्रघात हा फारशी लिपी व फारशी कागद यांच्या आगमनाने पडला असल्याचेही ते स्वीकारतात.[8] एवढेच नव्हे तर राजवाडेंच्या भरीव कार्यामुळेच मोडीलिपीविषयी महत्त्वपूर्ण माहिती जगासमोर प्रसिद्धीस आली.

## शिवरायांच्या कार्याविषयीची मीमांसा

मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रॅंड डफने शिवचरित्रावर आक्षेप घेणारा इतिहास लिहिला. मात्र हा इतिहास कसा चुकीचा आहे हे दाखवून शिवचरित्रांविषयीची सत्य मीमांसा त्यांनी केली. यावर राजवाडे म्हणतात की, शहाजी राजांनी बंगरूळहून अधिकारी शिवाजींसोबत पाठवून सह्याद्रीच्या लगतच्या प्रदेशात स्वतंत्र्य राज्य स्थापावे अशी मसलत केली. कारण कर्नाटकात विजापुरी सरदार व्देषभावनेने वागून शहाजी राजांना स्थिर होवू देत नव्हते. तेव्हा जन्मभर वणवण करीत फिरण्यापेक्षा स्वतःच्या पुणे, सुपे जहागिरीपासून स्वराज्याच्या कामास प्रारंभ करावा असे शहाजीराजांचे आपल्या अधिकाऱ्यांना निर्देश होते. त्यानुसार शिवाजी महाराजांची वाटचाल राहीली होती. विद्यासंपन्न, तज्ञ पुत्र शिवरायांमार्फत हे ध्येय साध्य करून घेतले.

शिवरायांचे स्वभाववर्णन व गुणदर्शन हे विशिष्ट पैलू राजवाडेंनी हेरले होते. शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वात सर्वगुणांचा समुच्चय असून

त्यांची तुलना सिझर, नेपोलियन, बोनापार्ट, क्रॉमवेल, वॉशिंग्टन इत्यादी नामवंत पाश्चात्य पुरुषांशी करतात. शौर्य, धैर्य, पराक्रम, कर्तृत्व याबरोबरच हेतुंची पावित्र्यता व स्वातंत्र्यार्थ खटपट ह्या गुणांशीही केली जाते. राजवाडे महाराजांची अशी तुलना करीत असतांनाच राजवाडे पुढे म्हणतात की, 'या पाश्चात्य महापुरुषांशी तुलना केल्यानेच शिवाजी महाराजांच्या कार्याचे मोजमाप परिपूर्ण होईल, असे नाही तर त्यांचे कार्य हे स्वयंसिद्ध आहे. महत्त्वाचे म्हणजे शिवरायांच्या साक्षरतेसंबंधी शंका घेणाऱ्या ग्रॅंड डफचे आक्षेप खोडून महाराजांच्या सर्वज्ञतेसंबंधी चौदा पुरावे देऊन ग्रॅंड डफच्या लिखाणात मोठ्या त्रुट्या असल्याचे सिद्ध केले.'[9]

## भारत इतिहास संषोधक मंडळाची स्थापना

भारतीय इतिहासाचे संशोधन व्हावे, ऐतिहासिक साधनाचा संग्रह करावा आणि संशोधनासाठी इतिहास लेखन व्हावे या उद्देशाने ष्अमेरिकन हिस्टॉरिकल असोसिएशनष प्रमाणेच कार्य करणाऱ्या भारत इतिहास संशोधन मंडळाची पुणे येथे 7 जुलै 1910 रोजी स्थापना केली. या कार्यात त्यांना सरदार खंडेराव महिंदळे, गणेश व्यंकट जोशी, काशिनाथ नारायण साने, द. वा. पोतदार यासारख्या सहविचारी इतिहास प्रेमींचे सहकार्य मिळाले.[10]

## राजवाडेंची राजकीय विचारप्रणाली

राजवाडे हे निष्ठावंत देशभक्त असल्याने देशाविषयीची भूमिका त्यांनी आपल्या राष्ट्रवादी विचारातून मांडली. नेमस्तांच्या कार्यप्रणालीवर त्यांचा विश्वास नव्हता. ते जहाल विचारांचे पुरस्कर्ते असल्याने 'स्वराज्य, राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार या चतुःसूत्रीचा अंगीकार केला. राजकारणापासून अलिप्त राहून ते स्वतःला ॲक्शन लिडर नव्हे तर थॉट लिडर समजत? राजवाडे हे लो. टिळकांच्या विचारांनी प्रभावित झाले असल्यामुळे स्वराज्यप्राप्तीसाठी सशस्त्रक्रांतीचे दिव्यस्वप्न पहात होते. त्यांच्यापुढे बिस्मार्क, जर्मनीचा सम्राट विल्यम पहिला, काव्हुर व व्हिक्टर इमॅन्युअल याप्रमाणेच शिवरायांचा आदर्श होता.'[11] एवढेच नव्हे तर भारतीय राष्ट्रीय सभेच्या यशस्वी वाटचालीकरिता ठामपणे आपली भूमिका मांडून नवी दिशा देण्याचे कार्य केले.

## सारांश

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी इतिहासासाठी संपूर्ण आयुष्य वेचले. भारतीय इतिहासाला शास्त्रीय वळण देणारे ते प्रथम इतिहासकार होते. त्यांच्या ह्या भरीव कार्यामुळेच त्यांना इतिहासाचार्य ही पदवी मिळाली. इतिहासाप्रमाणेच व्याकरण, भाषा, वाङ्मय, समाजशास्त्र मानववंशशास्त्र, लिपी यांचा सखोल अभ्यास करून सिद्धांत मांडलेत. इतिहासाला नवसंजीवनी प्राप्त करून दिली. ऐतिहासिक अस्सल साधन सामग्री गोळा करून येणाऱ्या पिढीला मोठी पार्श्वभूमी निर्माण करून दिली. आपल्या स्वभावाला आवर घालून इतिहास समृद्ध बनविला. भारतीय स्वातंत्र्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरलेल्या 18 व्या शतकात प्रतिकूल परिस्थितीतही भारत भ्रमण केले. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळातही राजकीय, धार्मिक, आर्थिक व सामाजिक बाबींवर विचार प्रकट केलेत. परकीय इतिहासकारांच्या चुकीचा इतिहास बाद ठरवून मराठ्यांच्या योगदानाला न्यारुय भावनेतून ऐतिहासिक आधार देऊन सिद्ध केले. त्यांच्या अविरत कार्याची सांगता धुळे शहरात झाली. 31 डिसेंबर 1926 रोजी इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडेंचे निधन झााले. त्यांचे कार्य चिरस्थायी ठेवण्याकरिता तात्यासाहेब भट यांनी धुळे येथे राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना केली.

## संदर्भग्रंथ

1) यावलकर अशोक, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे विचार आणि कार्य : स्वरूप, व्याप्ती आणि मूल्यमापन, अप्रकाशित शोधप्रबंध, 2007. पृ. 18.
2) तत्रैव. पृ. 19
3) भट भा. वा., इतिहासाचार्य वि. का. राजवाडे चरित्र, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 1946, पृ. 64.
4) देशपांडे प्र. न., शहा मु. ब. (संपा.), संशोधक त्रैमासिक, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 1985 पृ. 73.
5) भट भा. वा., उपरोक्त, पृ. 178.
6) शहा मु.ब. (संपा.), समग्र राजवाडे साहित्य खंड—9, राजवाडे इतिहास संशोधन मंडळ, धुळे, 1998, पृ.177.
7) हजिरनीस व. ग. (संपा.), स्मृती—शलाका, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, 1992, पृ. 16कृ
8) क्षीरसागर शेभादेवी, अस्सा हा महाराष्ट्र, के सागर पब्लिकेशन, पुणे, 1995. पृ. 228, 229.
9) यावलकर अशोक, उपरोक्त, पृ. 127—129.
10) तत्रैव, पृ. 23.
11) देशपांडे प्र. न. व शहा मु. ब. (संपा.), उपरोक्त, पृ. 75.



*प्रा. दिलीप आत्माराम शिरसाठ*
*इतिहास विभाग प्रमुख, ग्रामीण विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. म. दि.सिसोदे उर्फ भाऊसाहेब कला, वाणिज्य महाविद्यालय, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org